# महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित

पहिला मजला, 'साखर संकुल' शिवाजीनगर, पुणे-४११००५, दुरध्वनी क्र.(०२०)२९८०९४०८
ईमेल:mcdcpune@gmail.com वेबसाईट : www.mahamcdc.com

## कॉपशॉप विक्री व प्रदर्शनी केंद्र-चालविण्याविषयक

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे यांच्या साखर संकुल येथे शेतमाल विक्रीसाठी 'विक्री व प्रदर्शनी'' केंद्र चालविण्यासाठी अनुभवी शेतकरी उत्पादक कंपनीं / सहकारी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबत अधिक माहिती व अर्जाचा नमुना www.mahamcdc.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

व्यवस्थापकीय संचालक

MAHARASHTRA CO-OPERATIVE DEVELOPMENT CORPORATION LTD. PUNE

प्रति,

मा. व्यवस्थापकीय संचालक,

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या. पुणे.

विषय :- कॉपशॉप "विक्री व प्रदर्शनी केंद्र चालविण्यासाठी अर्ज

महोदय,

वरील विषयास अनुसरुन खालीलप्रमाणे माहिती सादर करीत आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | :- | | | |
| २ | संपर्क क्रमांक (वाट्सअप) | :- | | | |
| ३ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | :- | | | |
| ४ | आधार क्रमांक (सोबत छायांकीत प्रत जोडावीत) | :- | | | |
| ५ | शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था नाव, संपूर्ण पत्ता व सभासद संख्या | :- | | | |
| ६ | शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र, क्र. व दिनांक (सोबत छायांकीत प्रत जोडावीत) | :- | | | |
| ७ | शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्थेची मागील तीन वर्षाची उलाढाल(सोबत मागील तीन वर्षाची आर्थिक पत्रके जोडावीत) | :- | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ |
| ८ | पुणे शहरामध्ये मागील तीन वर्षाचा कृषिमाल विक्रीचा अनुभव नमूद करावा | :- | | | |
| ९ | शेतकरी कंपनी / सहकारी संस्थेच्या नावे पॅन नंबर, GST नंबर (सोबत छायांकीत प्रत जोडावी) | :- | | | |
| १० | उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारीत कामाचा अनुभव थोडक्यात नमूद करावा | :- | | | |
| ११ | संस्थेकडे उपलब्ध मुनष्यबळ संख्या | :- | | | |

तरी कृपया आमच्या अर्जाचा विचार व्हावा, हि विनंती.

दिनांक: अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे.

(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत कंपनी)

पहिला मजला,साखर संकुल" न..ता.वाडी,शिवाजीनगर,पुणे-४११००५,दूरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८

CIN:U65191PN2000SGC01560, ई-मेल: mcdctraining2021@gmail.com


संदर्भ:जा.क्र./मसविम/ कॉपशॉप -पुणे / 1830 /२०२२

दिनांक:२४ /०६/२०२२

## "कॉपशॉप- प्रदर्शनी व विक्री केंद्र"

## मार्गदर्शक सुचना, अटी व शर्ती

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणेमार्फत "कॉपशॉप" हि संकल्पना राबविण्यात येत आहे. या माध्यमातून वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, महिला बचत गट यांच्या कृषी व कृषी आधारीत उत्पादनाची माहिती शहरी ग्राहकांना व्हावी व कृषी व कृषी आधारीत उत्पादने उत्पादक ते थेट ग्राहक या तत्वावर रास्त दरात उपलब्ध व्हावी यासाठी महामंडळ प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगाने साखर संकुल येथील कॉपशॉप "प्रदर्शनी व विक्री" केंद्र चालविण्यास अनुभवी शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्थांना देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी इच्छुकांकडून सिलबंद लिफाफ्यात अर्ज मागविण्यात येत आहे. त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. हे केंद्र शेतक-यांचा उत्पादीत भाजीपाला, फळे, कृषी व कृषी आधारीत नाविन्यपूर्ण प्रक्रियायुक्त पदार्थ प्रदर्शित व विक्री करण्यासाठी देण्यात येत आहे.

२.प्रदर्शन व विक्री केंद्र हे पहिला मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे येथे आहे व त्याचे अंदाजे आकारमान २२१ चौ. फुट असून त्यामध्ये ८ डीसप्ले रॅक, एक डीप फ्रीझर (चालु स्थितित) व ३३ क्रेट इ. उपलब्ध आहेत.

३. यासाठी नाममात्र मासिक देखभाल शुल्क रु.१०००+GST एवढे आकारण्यात येईल. ते आपणास दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे या नावाने चेकद्वारे जमा करावे लागेल.

४.सदर "प्रदर्शनी व विक्री केंद्रासाठी" आवश्यक त्या मालाची उपलब्धता-शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, महिला बचत गट यांच्याकडून केंद्र चालकांनी करावयाची आहे. अशा नामांकित उत्पादक धारकांची यादी महामंडळाकडुन पुरविण्यात येईल.

५.प्रदर्शनी चालकाने प्रदर्शनासाठी दिलेली जागा, समोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्विकारावयाची असुन, कार्यालयीन शिस्तीचे पालन करावयाचे आहे.

६. प्रदर्शनी चालकाने ज्या कामासाठी जागा दिलेली आहे, त्याच कामासाठी जागेचा वापर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये पोट भाडेकरु किंवा इतरांस वापरावयास देता येणार नाही.

७. मालाचा पुरवठादार व केंद्र चालक यामधील माल पुरवठा किंवा आर्थिक व्यवहारसाठी महामंडळाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. परंतु याबाबत पुरवठादार व केंद्र चालक या कामाचा वेळोवेळी आढावा महामंडळामार्फत घेण्यात येईल व व्यवसाय वृध्दिंगत करण्यासाठी महामंडळ आवश्यक ते सहकार्य करेल. यासाठी त्रिसदस्यीय समितीचे गठण करण्यात येईल.

८. शहरातील गृहनिर्माण संस्थामध्ये प्रती वर्षी १० कॉपशॉप चालू करण्यासाठी आवश्यक ती मदत महामंडळामार्फत करण्यात येईल.

९. सदर केंद्र प्रथमतः ११ महिन्यासाठी करार तत्वावर चालविण्यास देण्यात येईल व वेळोवेळी केंद्राच्या प्रगतीचा आढावा घेवून पुढील तीन वर्षे मुदत वाढ देणे किंवा नाकारणे हा हक्क महामंडळाकडे अबाधित ठेवण्यात येत आहे व याबाबत लिखित करार हा रु. ५०० च्या मुद्रांकावर केंद्र चालकास महामंडळास करुन देणे बंधनकारक राहील.

१०. पुणे शहरात असणा-या उत्पादक ते ग्राहक तत्वावर चालविण्यात येणाऱ्या आठवडा बाजारामध्ये कॉपशॉप मधील उत्पादनांची प्रदर्शनी व विक्री करणे केंद्र चालकास बंधनकारक राहील.तसेच इतर माध्यमातुन थेट उत्पादक ते ग्राहक विक्री करणे अपेक्षित आहे.

११.शहरातील मोठया गृहनिर्माण संस्थांमध्ये अशा रीतीने कमीतकमी १० विक्री केंद्र चालु करण्याबाबत केंद्र चालकाने पुढाकार घेऊन चालू करावी जेणे करून ग्रामीण भागातील उत्पादनांना शाश्वत विक्री व्यवस्था विकसित होईल व उत्पादक आणि ग्राहक यांचे हित साधले जाईल.

१२.इच्छुक शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था यांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत सकाळी १० ते ५ या वेळेत संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच आवश्यक त्या माहितीसह बंद लिफाफ्यात अर्ज महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., महिला मजला, साखर संकुल , शिवाजी नगर, पुणे-०५ येथे सादर करावा.

१३. याबाबतीत अनियमितता आढळल्यास एक महिन्याच्या पुर्वसुचनेने सदर करार रद्द करण्याचे अधिकार मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे यांना राहतील.

१४. नियुक्तीची प्रक्रिया ही संस्थेची उलाढाल, संस्थेचा नफातोटा, सभासद संख्या, पुणे शहरातील उलाढाल या आधारे करण्यात येईल.

MAHARASHTRA CO-OPERATIVE DEVELOPMENT CORPORATION LTD. PUNE

व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या.,पुणे.